**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७ ला मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः- नमुंम-१२१७/प्र.क्र.१७७/१७/नवि-२८**

मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा मार्ग,

राजगुरू हुतात्मा चौक, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांकः- २२ सप्टेंबर, २०१७**

**<u>वाचा</u>:-** १) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.ठामपा-२००२/८२१/प्र.क्र.८६/नवि-२३, दि.०२.०७.२००८.

२) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे अ.शा.पत्र क्र.नमुंम/प्रशा/आस्था-१/प्र.क्र.३६०/१८३९/२०१७, दि.०६.०५.२०१७.

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नामपा-२०१५/१६५२/प्र.क्र.१६६/नवि-२६, दि.१२.०५.२०१७.

४) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नमुंम-१२१५/३९४/प्र.क्र.१६/१५/नवि-२८, दि.२१.०८.२०१७.

५) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-१/३१०९/२०१७, दि.१.०९.२०१७ चे पत्र

**<u>प्रस्तावना</u>:-**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झालेले असल्यामुळे या भागातील नागरीकरणाचा वेग जास्त आहे. त्यामुळे, या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहती, छोटे-मोठे लघुउद्योग, स्मॉल स्केल इंडस्ट्रिज, गगनचुंबी इमारती, निवासी गृहसंकुले, गर्दीच्या बाजारपेठा, ए.पी.एम.सी. मार्केट, मॉल्स, हॉटेल्स, शाळा, कॉलेजेस, पेट्रोल पंप्स, केंद्र व राज्य शासनाच्या विविध संस्था व उपक्रम इत्यादी अस्तित्वात आले आहेत.

वाढलेल्या नागरीकरणामुळे व औद्योगिकरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन सेवा विभागाचे बळकटीकरण, विस्तार व आधुनिकीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी उक्त संदर्भाधीन क्र.४ येथील दि.२१.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली असून, आता त्या विभागाच्या सेवा प्रवेश नियमांना मान्यता देणेही आवश्यक आहे.

शासनाने महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५७ (३) नुसार ज्या पदांवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये विहित असेल, त्या पदांसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या पदांवर नेमणूक करण्याची पद्धती याबाबत नियम तयार करण्यासंदर्भात सर्व महानगरपालिकांना कळविले होते. नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमाच्या प्रस्तावासंदर्भात मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०८.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी अग्निशमन विभागासाठी सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१७ या नियमाचे प्रारुप दि.३०.०८.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केले. त्याअनुषंगाने नवी

मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७ ला मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

नवी मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अन्वये सादर केलेले अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७ या नियमांस (परिशिष्ट-१,२,३, ३-अ, ३-ब व ४) **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५३ च्या अनुसूची-ड मधील प्रकरण २ च्या नियम १-स तसेच कलम ४५७(३)(अ) व ३(ब) नुसार** या निर्णयाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नियमांस "नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१७" असे संबोधण्यात यावे.

३. सदर नियम आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तात्काळ शासन राजपत्रात प्रसिद्ध करावे. सदर नियम शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. या आदेशानुसार सर्व सांविधानिक बाबींची पुर्तता आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी करावयाची आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७०९२२१७२५०३०९२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2017.09.22 17:19:43 +05'30'

**(नवनाथ रा. वाठ)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
४. जिल्हाधिकारी, ठाणे.
५. महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
६. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
७. प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव (नवि-२८) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (नवि-२८).

# नवी मुंबई महानगरपालिका

## अग्निशमन विभाग

### सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७

# नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७

## <u>अनुक्रमणिका</u>


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (अ) | नियम | पृ. ३ ते पृ. १० |
| (आ) | वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना. | पृ.११ |
| (इ) | **<u>परिशिष्ट</u>- (१)**<br>सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती. | पृ.१२ ते पृ.१७ |
| (ई) | **<u>परिशिष्ट</u>- (२)**<br>संवर्गासाठी विहित केलेली अर्हता - विभागनिहाय. | पृ.१८ ते पृ.३४ |
| (उ) | **<u>परिशिष्ट</u>- (३)**<br>कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम-२०१७ | पृ.३५ ते पृ.३८ |
| (ऊ) | **<u>परिशिष्ट</u>- (३) "अ"**<br>विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग | पृ.३९ |
| (ए) | **<u>परिशिष्ट</u>- (३) "ब"**<br>विभागीय परीक्षा (अग्निशमन) | पृ.४० |
| (ऐ) | **<u>परिशिष्ट</u>- (४)**<br>पदोन्नतीसाठी एकीकृत संवर्ग | पृ.४१ |


oooooo

# नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्र.मसेप्र-२००७/नवि-२३- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५६ (अ) व या अधिनियमातील लागू असलेल्या अन्य तरतुदीद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून तसेच, राज्याच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम तसेच तत्संबंधात यापूर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम-४५७ (३) अंतर्गत महानगरपालिकेमधील अग्निशमन विभागात विविध पदांवर करावयाच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे:-

## <u>नियम</u>

**१. <u>संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती</u> :-**

१. या नियमांना "नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१७" असे संबोधण्यात येईल.
२. हे नियम अंतिमरित्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.
३. हे नियम नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील सर्व मंजूर पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील; मात्र, अन्यथा नमूद केले नसल्यास, अंशकालिक स्वरूपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पद्धतीने किंवा रोजंदारी तत्त्वावरील नियुक्त्या तसेच मानसेवा स्वरूपाच्या नियुक्त्यांना लागू होणार नाहीत.

**२. (अ) <u>व्याख्या</u> :-**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमांसाठी :-

(१) "शासन" म्हणजे, महाराष्ट्र शासन.
(२) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.
(३) "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "नवी मुंबई महानगरपालिका."
(४) "महापौर" म्हणजे, नवी मुंबई महानगरपालिकेचे महापौर.
(५) "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.
(६) "सक्षम प्राधिकारी" म्हणजे, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त.

(७) "नियुक्ती प्राधिकारी" म्हणजे, अधिनियमाच्या कलम-५३ च्या पोटकलम-(१) ते (३) च्या तरतुदींप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

(८) "निवड प्राधिकारी" म्हणजे, या नियमातील परिशिष्ट-(१) मध्ये विनिर्दिष्टीत केलेली कर्मचारी निवड समिती.

(९) "कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने तसेच, अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

(१०) "संवर्ग" म्हणजे, एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या "कायम, त्याचप्रमाणे हंगामी" शासनमान्य पदांचा समूह.

(११) "कलम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम.

(१२) "परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

(१३) "जोडपत्र" म्हणजे, या नियमांच्या शेवटी जोडलेली जोडपत्रे.

(१४) "अनुसूची" म्हणजे, या नियमांच्या जोडपत्राला जोडण्यात आलेली अनुसूची.

(१५) "विभागीय परीक्षा" म्हणजे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट-(३) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(१६) "पदवी" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून प्राप्त केलेली पदवी.

(१७) "पदविका" म्हणजे, संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा भारतातील राज्य विधिमंडळाद्वारे विधि संस्थापित असलेले कोणतेही विद्यापीठ किंवा तंत्र शिक्षण मंडळ किंवा संसदेच्या अधिनियमाद्वारे किंवा तत्सम अधिनियमाद्वारे स्थापना करण्यात आलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेतून तंत्र निकेतनातून प्राप्त केलेली पदविका.

(१८) "व्यावसायिक अर्हता (Professional Qualification)" म्हणजे, अग्निशमन अभियांत्रिकी पदवी (B.E. Fire) अग्निशमन अभियांत्रिकी उच्च शिक्षा पदविका (Advance in Fire Engineering), अग्निशमन अभियांत्रिकी पदविका, (Diploma in Fire Engineering) उप अग्निशमन अधिकारी हे पाठ्यक्रम (राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण अकादमी, मुंबई मधून उत्तीर्ण झालेले अथवा Institute of Fire (U.K.) किंवा (India) या संस्थेमधून M.I. (Fire) किंवा Grade (I) (Fire) उत्तीर्ण झालेले).

(१९) "स्वीयेतर सेवा (Foreign Service)" म्हणजे, ज्या सेवेत नवी मुंबई महानगरपालिका, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्याला त्यांचे वेतन व भत्ते महानगरपालिकेच्या निधी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही साधनाद्वारे मिळतात अशी सेवा.

(२०) “मुलाखत” म्हणजे, नवी मुंबई महानगरपालिका, अग्निशमन विभागामध्ये असलेल्या पदावरील/पदांवरील नियुक्तीकरिता अर्ज केलेल्या उमेदवाराची सक्षम निवड प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या स्वत:च्या सदस्यांमधून अशा प्राधिकरणाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या समितीने आणि ज्या पदांकरिता त्याने किंवा तिने अर्ज केला आहे, त्या पदांवरील नियुक्तीकरिता निवड करण्यासाठी अशा रितीने मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांची योग्यता किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने आणि अशा मुलाखत घेण्यात आलेल्या उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे अनुक्रम लावण्यासाठी घेतलेली मुलाखत, असा आहे.

(२१) “समतुल्य/समकक्ष अर्हता” म्हणजे, संबंधित अर्हतेला समान म्हणून शासनाकडून जाहीर केलेली अर्हता, असा आहे आणि याबाबत कोणताही संदेह/वाद उद्भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(२२) “मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था” म्हणजे, शासनाची मान्यता असलेली संस्था, असे आहे.

(२३) “माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा” म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेली शालांत प्रमाणपत्र परीक्षा असे आहे आणि यात शासनाने या परीक्षेशी समान म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही इतर परीक्षेचा समावेश आहे.

(२४) “औद्योगिक प्रशिक्षण संस्था” म्हणजे, राज्य शासनाने विविध प्रकारच्या औद्योगिक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने तयार केलेले औद्योगिक प्रशिक्षण केंद्र.

(२५) “समय श्रेणी वेतन” म्हणजे, असे वेतन जे, या नियमात घालून देण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधीन किमान पासून कमाल पर्यंत नियतकालिक वेतनवाढीने वाढते.

(२६) “लेखी परीक्षा” म्हणजे नवी मुंबई महानगरपालिका, अग्निशमन विभागाकडून योग्य रितीने नामनिर्देशित करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाकडून, पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या योग्यतेचे किंवा अन्यथा मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनाकरिता, घेतलेली परीक्षा आणि त्या लेखी परीक्षेतील उमेदवारांच्या कामगिरीचा संबंध असेल तेथवर त्यांच्या गुणवत्तेचा क्रम लावण्याच्या उद्देशाने घेतलेली परीक्षा, असा आहे.

(२७) “व्यावसायिक परीक्षा” म्हणजे, उमेदवारांच्या तांत्रिक कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका एखाद्या अभिकरणाकडून अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत आयोजित केलेली परीक्षा, असा आहे.

(२८) “निवड समिती अध्यक्ष” म्हणजे, कर्मचारी/अधिकारी निवड समितीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निवड समिती अध्यक्ष म्हणून नियुक्त केलेले अधिकारी.

(२९) “एकीकृत संवर्ग” म्हणजे, विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरूप, ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करून सेवा नियमासाठी एकीकृत केलेला संवर्ग.

(३०) “अर्हताप्राप्त कर्मचारी” म्हणजे, नियमाच्या परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी.

या नियमांत वापरण्यात आलेल्या, परंतु व्याख्या न केलेला शब्द किंवा शब्द समुहांचा अर्थ अधिनियमात दिल्यानुसार असेल.

**२. (ब) अग्निशमन सेवा:-** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम, २००७ मध्ये समाविष्ट असलेल्या “अग्निशमन सेवा”.

**२. (क)** नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागातील सेवांचे गट पुढीलप्रमाणे असतील:-

(१) अधिकारी- गट-अ व गट-ब

(२) कर्मचारी- गट-क

**३. नेमणूकीची पद्धत व अर्हता :-**

(१) **नियुक्तीची पद्धत :-** महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीची कार्यपद्धती परिशिष्ट-(१) मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण, अनुभव इत्यादी आवश्यक अर्हता परिशिष्ट-(२) मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पद्धत अधिनियमाच्या कलम-५४ व अनुसूची-ड मधील प्रकरण-३ नुसार असेल.

(२) **भारतीय नागरिकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र :-** उमेदवार भारताचा नागरिक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(३) **संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता :-** परिशिष्ट-(२) मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी-४ ची पदे वगळून, इतर सर्व पदांवरील नेमणुकीसाठी/पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल, असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

(४) **वयोमर्यादा :-** महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासनाचे प्रचलित नियम व त्या अनुषंगाने वेळोवेळी काढण्यात आलेले शासन निर्णयात नमूद केल्यानुसार असेल. नवी मुंबई महानगरपालिकेत विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल. जेथे कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल, अशा पदांच्याबाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल. सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरिता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल. तसेच वर्ग-१ च्या पदांची कमाल वयोमर्यादा शिथील करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना शासन मान्यता घेण्याच्या अटीवर राहतील.

(५) **<u>पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण</u>** :-

**(क)** नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण परिशिष्ट-(२) मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल. तथापि, ज्या पदासमोर असे प्रमाण विहित केलेले नसेल, अशा पदावरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहील.

**(ख)** एकाकी पद सामान्यत: पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि, विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद नामनिर्देशनाने भरता येईल.

**४. <u>पदोन्नतीने नेमणूक करणे</u> :-**

पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता-नि-पात्रता या तत्त्वावर, अर्हताप्राप्त नियमितरित्या कार्यरत कर्मचाऱ्यांमधून केली जाईल.

**५. <u>प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक</u> :-**

या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार महानगरपालिकेतील ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे, अशी पदे केंद्र शासन, राज्य शासन, इतर स्थानिक स्वराज्य संस्था व स्थानिक प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरता येतील.

**६. <u>एका महानगरपालिकेतून दुसऱ्या महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती</u> :-**

या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, एका महानगरपालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने अन्य महानगरपालिकेतील सम संवर्गीय पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तींवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल.

**अ)** पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या समसंवर्गीय व समान वेतन श्रेणीच्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

**ब)** अशी नियुक्ती झाल्यानंतर, त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

**क)** गट-अ आणि गट-ब मधील अधिकाऱ्यांच्याबाबत एका महानगरपालिकेतून दुसऱ्या महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तींवर, शासन मान्यतेने घेतला जाईल.

**ड)** केवळ विहित प्रक्रियेद्वारे व शासनमान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांचाच बदलीसाठी विचार केला जाईल.

**७. <u>परीविक्षाधीन कालावधी</u> :-**

गट-अ आणि गट-ब मध्ये नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परीविक्षाधीन कालावधी असेल. परीविक्षाधीन कालावधी राज्य शासनाच्या आदेशानुसार पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच अशा उमेदवारांचे परीविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**८. <u>भाषा परीक्षा, विभागीय परीक्षा व प्रशिक्षण</u> :-**

महानगरपालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी :-

(१) विहित करण्यात येतील अशा भाषा परीक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहित नियमानुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सूट मिळणे आवश्यक असेल.

(२) परिशिष्ट-(३) अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

(३) वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे, सेवा प्रवेशपूर्व आणि/किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुद्धा आवश्यक असेल.

**९. <u>महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता</u> :-**

एखाद्या व्यक्तीस :-

(क) अधिनियमाच्या कलम-५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल, किंवा

(ख) महापालिकेच्या सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(ग) ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(घ) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्याबाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

(च) जर त्यास/तिला दोन पेक्षा अधिक हयात अपत्य असतील, किंवा

(छ) न्यायालयात ज्या गुन्ह्यासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्ह्यासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा

(ज) महापालिकेच्या सेवेत असताना सिद्धापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरिक्षणात रद्द झाली नसेल.

अशी व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणूक देण्यास वा नेमणूक चालू ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

**१०. <u>महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण</u> :-**

महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष/समांतर आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, महिला, खेळाडू इत्यादीसाठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

**११. <u>शारिरीक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल</u> :-**

महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती :-

(अ) महापालिकेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, आणि

(ब) उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (Verification of Antecedents) पोलीस विभागाचे/ सक्षम प्राधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

**१२. <u>परीक्षेकरिता/मुलाखतीकरीता केलेल्या प्रवासाचा खर्च</u> :-**

नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्याच्या बाबतीत, परीक्षेच्या/मुलाखतीच्या प्रयोजनाकरिता उमेदवारांना करावे लागणारे सर्व प्रवास हे, याबाबतीत काही विनिर्दिष्ट प्रवर्गाच्या उमेदवारांच्या संबंधात वेळोवेळी शासन/महानगरपालिकेकडून मंजुर करण्यात आलेल्या कोणत्याही सवलतीच्या अधीन राहून, स्वत:च्या खर्चाने असतील.  याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना असेल.

**१३. <u>नियुक्तीकरिता निवड झाल्यावर पदस्थापना</u> :-**

नियुक्तीकरिता निवड झालेले उमेदवार हे नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत कोणत्याही ठिकाणी किंवा नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर अग्निशमन विभागाचे कार्यालय जेथे असतील तेथे किंवा अग्निशमन विभाग भविष्यकाळात जेथे कार्यालय सुरू करू शकेल, तेथे पदस्थापना केले जाण्यास पात्र ठरतील. तात्पुरत्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाकडून तशी मागणी आल्यास अशा कर्तव्याच्या ठिकाणी जावे लागेल.

**१४. <u>प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर</u> :-**

कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्ती संदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

**१५.** हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळी लेखी कारणे नमूद करून निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

१६. वेळोवेळी सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा/परिविक्षाधीन कालावधी नियमित करणे, इत्यादींबाबत निर्देश देणारे राज्य शासनाने नियम, अधिनियम, निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (Amendment) करण्यात येईपर्यंत या शासन निर्णय/न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१७. या नियमामधील कोणत्याही तरतुदीच्या अर्थविवरणाबाबत शंका उद्भवल्यास सदर बाब शासनाकडे निर्देशित करण्यात यावी व त्याबाबतीत शासनाचा निर्णय हा अंतिम राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2017.09.22 17:20:43 +05'30'

**(नवनाथ रा. वाठ)**
**शासनाचे अवर सचिव**

# <u>वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना</u>

मी, याद्वारे प्रमाणित करतो/करते की, ________________________ महानगरपालिकेच्या ( ) संवर्गातील ( ) पदावर नेमणूक करण्यासाठी असलेले उमेदवाराची तपासणी केली आणि त्याला/तिला __________________ अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारिरीक दौर्बल्य किंवा शारिरीक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट ( ) कार्यालयात ( ) म्हणून नेमणूकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही.

श्री./श्रीमती _______________________ यांच्या स्वत:च्या निवेदनावरून त्याचे/तिचे वय _____ वर्षे आहे आणि दिसण्यावरून तो/ती सुमारे ____ वर्षे वयाचा/वयाची आहे. त्याला/तिला लस टोचण्यात आली आहे.

**ओळख चिन्हे** ____________________

**डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे स्वाक्षरी** ____________________

**वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम**
**(शिक्क्यासह)**

# परिशिष्ट-(१)

# नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१७

**<u>नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१७ अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती</u> :-**

**१. <u>अधिकारी/कर्मचारी निवड समिती</u> :-**

महानगरपालिका पदांवर नियुक्तीकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-५४ मध्ये विहित केल्यानुसार 'कर्मचारी निवड समिती' गठीत करण्यात येईल. सदर समिती गठीत करण्यात आलेल्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीकरिता अथवा भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता (यातील जो कालावधी कमी असेल, त्या कालावधीकरिता) वैध राहील.

याव्यतिरिक्त, नामनिर्देशनाने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस <u>विशेष निमंत्रित</u> म्हणून बोलावले जाईल.

**२. <u>नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालीलप्रमाणे असेल</u>:-**

| | |
|---|---|
| १) आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | -अध्यक्ष |
| २) मुख्य लेखा परीक्षक | - सदस्य |
| ३) संबंधित विभाग प्रमुख | - सदस्य |
| ४) आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी | - सदस्य |
| ५) जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | - सदस्य |
| ६) जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - सदस्य |
| ७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | - सदस्य |
| ८) उप आयुक्त (प्रशासन) | - सदस्य सचिव व निमंत्रक |

**३. <u>नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीकरिता कार्यपद्धती</u> :-**

**(अ)** एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, ऑनलाईन/वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरून किंवा महानगरपालिकेच्या सूचना फलकावरील सुचनेस अनुसरून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्य संस्था/ कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करण्यात येईल.

**(ब)** उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

**(क)** जाहिरातीत/सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणी पत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास, अशा उमेदवारांना लेखी चाचणी द्यावी लागेल. परंतु, जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अशी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्तांना घेता येईल.

**(ड)** चाचणी परीक्षेत किमान ५०% गुण मिळविण्याच्या मर्यादेच्या अधीन राहून रिक्त पदाच्या तिप्पट एवढ्या उमेदवारांना वरील (क) च्या निर्णयाप्रमाणे चाचणी परीक्षा न घेतल्यास अशा सर्व निर्देशित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल व अशा उमेदवारांची यादी निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास मुलाखतीच्या वेळी पुरविण्यात येईल. परंतु, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५०% ऐवजी ४५% गुण मिळविण्याची अट राहील.

**(इ)** मुलाखतीत खालील बाबींवर विशेष लक्ष दिले जाईल:-

(१) सामाजिक प्रश्नाबाबतची जाणीव.

(२) पुर्वानुभव:- ज्या पदावर नेमणूक द्यावयाची त्या पदासाठी आवश्यक असा अनुभव.

(३) सेवा भरती नियमात विशेष अर्हता वा इतर कोणत्याही बाबतीत प्राधान्य नमूद असल्यास त्यासाठी द्यावयाचे गुण.

**(ड)** निवड समिती यानंतर एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्तांकडे पाठविण्यासाठी लिफाफ्यात बंद करील.

### ४. <u>सरळसेवा भरती करताना निकष व गुणांकन पद्धती</u> :-

लेखी परीक्षा (तांत्रिक/सामान्यज्ञान) - १०० गुणांची असेल.

लेखी परिक्षेसाठी पात्र ठरण्याकरिता अर्जदाराने सेवा भरती नियमांस अधीन राहून शैक्षणिक पात्रता/तांत्रिक शिक्षणाची अर्हता व अग्निशमन सेवा दलात कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी शारीरिक क्षमता असणे आवश्यक राहील.

जाहिरातीस असणारा एकूण प्रतिसादाचा विचार करून उमेदवारांना शारीरिक चाचणी परिक्षेस पात्र करण्यात येईल. तथापि, चालक यंत्रचालक व चालक (अग्निशमन) या पदासाठी या लेखी परीक्षेत सर्व साधारणत: आवश्यक पदांच्या १:५ किंवा १:७ या प्रमाणात अथवा जाहिरातीस असणाऱ्या एकूण प्रतिसादाचा विचार करून उमेदवारांना शारीरिक चाचणी परिक्षेस पात्र करण्यात येईल. तथापि, चालक यंत्र चालक व चालक (अग्निशमन) या पदांसाठी लेखी परीक्षा नसेल.

**किमान शारीरिक पात्रता** :- अग्निशमन सेवा विभागातील सर्व संवर्गातील पदांसाठी उमेदवारांची शारीरिक पात्रता खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. उंची | - | १६५ सें.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १६२ सें.मी.) |
| २. वजन | - | ५० कि.ग्रॅ. |
| ३. छाती - न फुगवता | - | ८१ सें.मी. |
| फुगवून | - | ८६ सें.मी. (किमान ५ सें.मी. फुगवणे आवश्यक राहील.) (महिला उमेदवारासाठी लागू नाही.) |
| ४. दृष्टी | - | सामान्य (उपरोक्त शारीरिक पात्रता नसणारे उमेदवार पुढील चाचणीसाठी पात्र ठरणार नाहीत.) |

**शारीरिक क्षमता/पात्रता चाचणी** :-

| | | |
|---|---|---|
| १. १५ फूट दोर चढणे | - | १५ गुण |
| २. १०० मीटर्स अंतर ५० किलोग्रॅम मानवी प्रतिकृती खांद्यावर घेऊन धावणे | - | १५ गुण |
| ३. शिडी चढणे/उतरणे | - | १५ गुण |
| ४. उंची - (अधिक असल्यास) | - | ०५ गुण |
| ५. पोहणे | - | २० गुण |

**१) दोर चढणे ( एकूण गुण-१५)**

| **अंतर** | **गुण** |
|---|---|
| पूर्ण | १५ |
| ३ / ४ | १२ |
| १ / २ | ०८ |
| १ / ४ | ०४ |

**२) १०० मीटर अंतर ५० कि.ग्रॅ. मानवीय प्रतिकृती खांद्यावर घेऊन धावणे-(एकूण गुण-१५)**

| **वेळ (सेकंद)** | **गुण** |
|---|---|
| २० किंवा कमी | १५ |
| २१ | १४ |
| २२ | १३ |
| २३ | १२ |
| २४ | ११ |
| २५ | १० |
| २६ | ९ |

| **वेळ (सेकंद)** | **गुण** |
|---|---|
| २७ | ८ |
| २८ | ७ |
| २९ | ६ |
| ३० | ५ |
| ३० पेक्षा अधिक | ० |

**३) <u>शिडी चढणे/उतरणे</u> ( एकूण गुण-१५)**

| **वेळ (सेकंद)** | **गुण** |
|---|---|
| २० किंवा कमी | १५ |
| २१ | १४ |
| २२ | १३ |
| २३ | १२ |
| २४ | ११ |
| २५ | १० |
| २६ | ९ |
| २७ | ८ |
| २८ | ७ |
| २९ | ६ |
| ३० | ५ |
| ३० पेक्षा अधिक | ० |

**४) <u>उमेदवारांच्या उंची सापेक्ष देण्यात येणारे गुण</u> (एकुण गुण-०५)**

| **से.मी.** | **गुण** |
|---|---|
| १३५- १६७.९ | ० |
| १६८- १७०.९ | ०१ |
| १७१- १७३.९ | ०२ |
| १७४ - १७६.९ | ०३ |
| १७७ - १७९.९ | ०४ |
| १८० पेक्षा जास्त | ०५ |

५) **<u>पोहणे</u> :- ( २५ मीटर ) (एकूण गुण-२०)**

| **वेळ (सेकंद)** | **गुण** |
|---|---|
| ३५ किंवा कमी | २० |
| ३६-४० | १५ |
| ४१-४५ | १० |
| ४६-५० | ०८ |
| ५१-५५ | ०४ |
| ५५ पेक्षा अधिक | ० |

**४. <u>पदोन्नतीने नेमणुकीकरिता कार्यपद्धती</u> :-**

**(अ)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.५६६/का.१२, दि.०८.०१.२०१६ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी पदोन्नतीची प्रक्रिया विहित कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी वेळापत्रकाचे कोटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(**ब**) प्रत्येक वर्षी १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत, याचा आढावा नवी मुंबई महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन विभागातर्फे दरवर्षी जून महिन्यात आयुक्तांना सादर करतील.

**(क)** उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करताना, पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांतून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट (१:३) कर्मचाऱ्यांचा विचारक्षेत्रात (Zone of Consideration) समावेश करण्यात येईल.

**(ड)** ज्याच्या विरुद्ध विभागीय चौकशी चालू आहे वा जे निलंबित आहेत, त्यांचीही नावे ज्येष्ठतानुक्रमाने यादीत येत असल्यास, अशा यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात यावा.

**(इ)** निवडसूचीत समावेश झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाची सरासरी क्रमवारी अतिउत्कृष्ट असेल, अशा कर्मचाऱ्यास सेवाज्येष्ठतेप्रमाणे येणाऱ्या ६ स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याची शिफारस निवड समितीला करता येईल. हा अपवाद वगळता, पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांचा निवडसूचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल. मात्र, अत्युत्कृष्ट (अ+) अहवालासाठी कर्मचाऱ्याला निवडसूचीत वरचा क्रमांक देतांना सेवेने ज्येष्ठ असलेल्या व उत्कृष्ट (अ) अहवाल असणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा वरचे स्थान देता येणार नाही.

**(ई)** निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली इतर कागदपत्रे यांचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही, तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

**(फ)** कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

**५.** वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस अधिनियमाच्या कलम- ५३ (१), ५३ (२) वा ५३ (३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

**६.** तयार करण्यात आलेली निवडसूची तयार केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध असेल.

**७.** समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

**८.** गट-क आणि गट-ड मध्ये सेवा भरती करताना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्र.न्याप्र-१००३/९९/प्र.क्र.२/०३(भाग-२)/१६अ, दि.२५ ऑक्टोबर, २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वांचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आणण्यात यावेत.

०००००००

परिशिष्ट-(२)

# नवी मुंबई महानगरपालिका

## अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५ व ५३ (१) मधील तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिकाऱ्यांच्या पदांसाठीची कलम-४५ (३) व कलम-४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता**

**(पहा नियम-३)**

| अ.क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br>(५) |
|---|---|---|---|---|
| १. | मुख्य अग्निशमन अधिकारी (Chief Fire Officer) (गट-अ) | नामनिर्देशन/ पदोन्नती | १ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>**१)** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**२)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire) धारण केलेली असावी, **किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी, **किंवा** The Instititution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire) **किंवा** कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व असावे.<br>**३)** मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>**४)** MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा. |

| अ.क्र.<br><br><br><br><br>(१) | पदनाम<br><br><br><br><br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br><br><br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br><br><br><br><br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **ब) <u>शारीरिक पात्रता</u>:-**<br>**१)** नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ५५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.<br>**२)** अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरोगी व सुदृढ शरीरयष्टी असावी.<br>**क) <u>अनुभव</u>:-**<br>"क" वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>उप मुख्य अग्निशमन या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच, सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस पात्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.१५,६००-३९,१०० (ग्रेड वेतन रु.५,४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.३००/-, जोखीम भत्ता, रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |
| २. | उप मुख्य अग्निशमन अधिकारी (Deputy Chief Fire Officer) (गट-ब) | नामनिर्देशन/ पदोन्नती | १ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>**१)** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**२)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire) |

| अ.क्र.<br><br><br><br><br>(१) | पदनाम<br><br><br><br><br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br><br><br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br><br><br><br><br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | धारण केलेली असावी, **किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी, **किंवा** The Instititution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire) **किंवा** कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व असावे.<br>**३)** मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>४) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>शारीरिक पात्रता</u>:-**<br>**१)** नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक नसावे.<br>**२)** अग्निशमन सेवेत प्रशासकीय व ऑपरेशनल कामासाठी उमेदवाराची निरोगी व सुदृढ शरीरयष्टी असावी.<br>**क) <u>अनुभव</u>:-**<br>"क" वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उप मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>विभागीय अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच, उक्त नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणारा अधिकारी सेवा ज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्त करण्यात येईल. पदोन्नतीसाठी |

| अ.क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,६००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.३००/-, जोखीम भत्ता रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |
| **३.** | विभागीय अग्निशमन अधिकारी (Divisional Fire Officer) (गट-क) | नामनिर्देशन/ पदोन्नती | १ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>**१)** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**२)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire) धारण केलेली असावी, **किंवा** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) धारण केलेली असावी, **किंवा** The Instititution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.-Fire) **किंवा** कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Instititution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व असावे.<br>**३)** मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>**४)** MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>अनुभव</u>:-**<br>"क" वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये विभागीय |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**क) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या तसेच, उक्त नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणारे अधिकारी सेवा ज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्त करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,३००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.२००/-, जोखीम भत्ता रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |
| ४. | अग्निशमन केंद्र अधिकारी (Fire Station Officer) (गट-क) | नामनिर्देशन/ पदोन्नती | ४ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>**१)** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**२)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा. **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | केलेला असावा. **किंवा** The Instititution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade-I ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>**३)** मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>४) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली.<br>**क) <u>अनुभव</u>:-**<br>"क" वर्ग महानगरपालिका/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**ड) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या |

| अ.क्र.<br><br><br><br><br>(१) | पदनाम<br><br><br><br><br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br><br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br><br><br><br><br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | तसेच, उक्त नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणारे अधिकारी सेवा ज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्त करण्यात येतील. जर, राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Station Officer & Instructor Course पूर्ण केलेला नसेल तर, उमेदवारांना पदोन्नतीनंतर ३ वर्षात कोर्स पूर्ण करणे आवश्यक राहील. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. वेतन:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,३००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. भत्ते:-**<br>ऑनकॉल पे रु.२००/-, जोखीम भत्ता रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |
| ५. | कार्यदेशक (वाहन) (ऑटोमोबाईल फोरमन) (गट-क) | नामनिर्देशन-१००% | १ | **१. नामनिर्देशन:-**<br>**अ) शैक्षणिक पात्रता:-**<br>१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदविका D.M.E./D.A.E.<br>२) R.T.O. जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>३) जड वाहन दुरुस्तीचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**२. वेतन:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,२००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**३. भत्ते:-**<br>ऑनकॉल पे रु.२००/-, जोखीम भत्ता रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| ६. | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (Assistant Fire Station Officer) (गट-क) | नामनिर्देशन-२५% पदोन्नती-७५% | १४ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>**१)** कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>**२)** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा **किंवा** The Instititution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade-I ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>**३)** मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>**४)** MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली.<br>**क) <u>अनुभव</u>:-**<br>"क" वर्ग महानगरपालिकांमध्ये सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा इतर वर्ग महानगरपालिकेतील समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | केलेली असावी.<br>**ड) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>१) नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>अग्निशमन प्रणेता (लिडींग फायरमन) या पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा ड्रायव्हर ऑपरेटर या पदावर किमान ५ वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेल्या तसेच, उक्त नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी सेवा ज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने ५०:५० या प्रमाणात अग्निशमन प्रणेता व ड्रायव्हर ऑपरेटर या पदांमधून नियुक्त करण्यात येतील. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,२००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.२००/-, जोखीम भत्ता रु.१५०/- व युनिफॉर्म अपकीप रु.२००/- |
| ७. | निरीक्षक (बिनतारी संदेश) (गट-क) | नामनिर्देशन-१००% | १ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडील |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील) २ वर्षांचा खालीलपैकी कोणताही एक अभियांत्रिकी व्यावसायिक अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा.<br>अ) मॅकेनिक कम ऑपरेटर इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन सिस्टम.<br>ब) यांत्रिकी रेडिओ व दूरचित्रवाणी.<br>क) माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक सिस्टम मेन्टेनन्स.<br>ड) वायरलेस मॅकेनिक कम ऑपरेटर.<br>इ) इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.९,३००-३४,८०० (ग्रेड वेतन रु.४,२००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी. |
| ८ | अग्निशमन प्रणेता (Leading Fireman) (गट-क) | नामनिर्देशन-२५%<br>पदोन्नती-७५% | ४२ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.<br>३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>४) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू |

| अ.क्र.<br><br><br><br><br>(१) | पदनाम<br><br><br><br><br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br><br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br><br><br><br><br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली.<br>**क) <u>अनुभव</u>:-**<br>उमेदवाराला महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरण/शासकीय/निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन प्रणेता किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्षे कामाचा अनुभव असावा.<br>**ड) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>अग्निशामक या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा झालेले कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्त करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२८००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.१५०/-, जोखीम भत्ता रु.१००/- व युनिफॉर्म अपकीप रु.१५०/- |
| ९ | चालक यंत्रचालक (Driver-Operator) | नामनिर्देशन-२५%<br>पदोन्नती-७५% | ५६ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| अ.क्र. | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | २) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>**३)** जड वाहन चालक म्हणून ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>५) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली.<br>**क) <u>पाठ्यक्रम</u>:-**<br>उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर, त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केला नसेल तर, त्या प्रशिक्षण केंद्राचा ३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>**२. <u>पदोन्नती</u>:-**<br>वाहन चालक (अग्निशमन) या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा झालेले |

| अ.क्र.<br><br><br><br><br>(१) | पदनाम<br><br><br><br><br>(२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती<br>(३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या<br><br><br>(४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती<br><br><br><br><br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | | | कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**३. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**४. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.१५०/-, जोखीम भत्ता रु.१००/- व युनिफॉर्म अपकीप रु.१००/- |
| १० | अग्निशामक (Fireman Rescuer) | नामनिर्देशन-१००% | २९४ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.<br>३) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>४) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली. |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | **क) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२०००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**३. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.१००/-, जोखीम भत्ता रु.१००/- व युनिफॉर्म अपकीप रु.१००/- |
| ११ | वाहनचालक (अग्निशमन) (Driver-Fire) (गट-क) | नामनिर्देशन-१००% | ३ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>३) वाहन चालक या पदावर किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता</u>:-**<br>१) उंची १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची १६२ सें.मी.)<br>२) छाती- साधारण ८१ सें.मी. फुगवून-५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी- चांगली.<br>**क) <u>पाठ्यक्रम</u>:-**<br>उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर, त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केला नसेल तर, त्या प्रशिक्षण केंद्राचा ३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त असू नये.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२०००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी.<br>**३. <u>भत्ते</u>:-**<br>ऑनकॉल पे रु.१००/-, जोखीम भत्ता रु.१००/- व युनिफॉर्म अपकीप रु.१००/- |
| १२ | सिनिअर रेडिओ टेक्निशियन (Senior Radio Technician) (गट-क) | पदोन्नती-१००% | १ | **१. <u>पदोन्नती</u>:-**<br>सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे ज्युनिअर रेडिओ टेक्निशियन या पदावरील कामकाजाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२४००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | केलेली वेतनश्रेणी. |
| १३ | ज्युनिअर रेडिओ टेक्निशियन (Junior Radio Technician) (गट-क) | नामनिर्देशन-१००% | १ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) उच्च माध्यमिक शालांत शास्त्र शाखेची परीक्षा (H.S.C.) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>२) शासन मान्यताप्राप्त संस्थेचा D.R.E. किंवा तत्सम कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) रेडिओ टेक्निशियन या कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.१९००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी. |
| १४ | मोटर मॅकेनिक (गट-क) | पदोन्नती-१००% | ३ | सहाय्यक मोटर मॅकेनिक या पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा झालेले कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता व पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्त करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br>**<u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२०००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी. |
| १५ | सहाय्यक मोटर मॅकेनिक (गट-क) | नामनिर्देशन-७५% | ३ | **१. <u>नामनिर्देशन</u>:-**<br>**अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>:-**<br>१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) आय.टी.आय. मधील मोटर मॅकेनिक/डिझेल मॅकेनिक/समकक्ष कोर्स उत्तीर्ण |

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी १. नामनिर्देशन २. पदोन्नती ३. प्रतिनियुक्ती (३) | आकृतीबंध अनुसार मंजूर पदसंख्या (४) | नेमणूकीकरिता अर्हता, वेतन, भत्ते व इतर अटी व शर्ती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | असावा.<br>३) जड वाहन चालविण्याचा कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>५) मराठी भाषेतून प्रशासकीय कामकाज करता यावे, यासाठी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे).<br>६) MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>वयोमर्यादा</u>:-**<br>नामनिर्देशनाच्या उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल शासनाने वेळोवेळी निर्देशित केल्यानुसार असेल.<br>**२. <u>वेतन</u>:-**<br>वेतन रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.१९००) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी. |

**ooooooo**

## परिशिष्ट-(३)

## नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम-२०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम-४६५, पोटकलम-(१) खंड (ल) च्या तरतुदींनुसार महानगरपालिकांसाठी केलेले नियम.

## नियम

**१. संक्षिप्त शीर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक :-**

**(अ)** या नियमास "नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम, २०१७" असे संबोधण्यात येईल.

**(ब)** शासन राजपत्रात प्रसिद्ध होतील, त्या तारखेपासून हे नियम अंमलात येतील.

**२. व्याख्या:-**

**(१) विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार :-**

(१) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.

(२) "महानगरपालिका" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्माण केलेली "नवी मुंबई महानगरपालिका."

(३) "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-३६ अन्वये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

(४) "कर्मचारी" म्हणजे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण-४, कलम-५१ (४) अन्वये नेमणूक केलेले अधिकारी/कर्मचारी. परंतु, यात रोजंदारीवर, हजेरीपटावर असलेले कामगार आणि कंत्राटी पद्धतीने तसेच, अंशकालीन व मानद स्वरुपी नेमण्यात आलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

(५) "परिशिष्ट" म्हणजे, या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

(६) "विभागीय परीक्षा" म्हणजे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेली व या नियमांच्या परिशिष्ट-(३) (अ) मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(२) ज्या शब्दांची वा शब्दसमुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल, त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

## २. <u>विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य</u> :-

**(अ)** हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील स्थायी/अस्थायी स्वरुपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या <u>परिशिष्ट-(३) (अ)</u> मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना <u>परिशिष्ट-(३) च्या 'ब'</u> मध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

**(ब)** उपरोक्त <u>परिशिष्ट-(३) 'ब'</u> मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल, त्या संवर्गासाठी आयुक्तांच्या मान्यतेने अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी लेखी अथवा लेखी व तोंडी परीक्षा विहित केली जाईल. याकरिता किमान तीस दिवसांपेक्षा कमी नाही, एवढ्या कालावधीची पुर्वसूचना संबंधितांस देण्यात येईल.

## ३. <u>मराठी भाषा परीक्षा</u> :-

नवी मुंबई महानगरपालिकेतील गट-अ ते गट-क वर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना मराठी विषयासह शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा शासनाने विहित केलेली एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## ४. <u>कालावधी आणि संधीची संख्या</u> :-

**(अ)** राजपत्राच्या दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तींकरिता कालावधी व संधीची संख्या या नियमांच्या अधीन राहून, राजपत्राच्या दिनांकापूर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणून नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-११ अन्वये सूट दिलेली नसेल, तर राजपत्राच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या आत व २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**(ब)** नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१७ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## ५. <u>परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक</u> :-

**(अ)** नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या किमान ५०% गुण मिळवणे आवश्यक असेल.

**(ब)** प्रत्येक संवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या सर्व विषयांत वरील तरतुदींच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

६. **<u>परीक्षेचे वेळापत्रक</u>** :-

विभागीय परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या सक्षम प्राधिकारी यांनी विहित केलेल्या अभिकरणाकडून सर्वसाधारणपणे दरवर्षी प्रशासनाच्या/अभिकरणाच्या सोयीनुसार अशा परीक्षा मे ते जून महिन्यात घेतल्या जातील.

७. **<u>परीक्षेचा अभ्यासक्रम</u>** :-

**अ)** विभागीय परीक्षेसाठी संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी विहित केल्याप्रमाणे अभ्यासक्रम असेल.

**ब)** परंतु, अग्निशमन विभागातील सहाय्यक केंद्र अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीच्या नागपूर अग्निशमन महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या व महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था, नाशिक यांचेकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

८. **<u>प्रशिक्षण</u>** :-

विभागीय परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परीक्षेपूर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम नवी मुंबई महानगरपालिकेकडून आयोजित करण्यात येईल.

९. **<u>अनुग्रह गुण</u>** :-

संपूर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या एकूण गुणांच्या ५०% किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळवले असतील परंतु, एक किंवा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकांमध्ये ५०% गुण तो मिळवू शकला नसेल तर त्याला त्या विषयांमध्ये अथवा एकूण परीक्षेत जास्तीत जास्त ४ अनुग्रह गुण, जर त्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रयत्नांमध्ये सूट देण्यात आलेली आहे, त्यांनासुद्धा ही सवलत देण्यात येईल.

१०. **<u>परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम</u>** :-

एखादा कर्मचारी नियम-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील:-

**(अ)** तो परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम-११ अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही, किंवा त्याच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशा रितीने रोखून ठेवलेली वेतनवाढ तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम-११ अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकीची रक्कम अनुज्ञेय नसेल.

**(ब)** त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच, अशा ज्या कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल त्या कर्मचाऱ्यास ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्या नंतर परंतु, नियम-४ मध्ये विर्निदिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नंतरचा ज्येष्ठता क्रम त्याला देण्यात येईल.

**११. <u>परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट</u> :-**

(१) राजपत्राच्या दिनांकानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील बाबतीत सूट देण्यात येईल:-

**(अ)** त्यास यापूर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी, किंवा

**(ब)** तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशा प्रकरणी,

(२) कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

**१२.** परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाही तर कालावधी व संधीची गणना करतांना कालावधी वगळण्यात येईल.

**१३. <u>निर्वचनाच्या शक्ती</u> :-**

या नियमातील तरतुदींनुसार अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल.

०००००००

**परिशिष्ट-(३) ‘अ’**
**(नियम-३)**

**<u>विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग</u>**

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशामक/ड्रायव्हर ऑपरेटर |

**<u>महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर प्राधिकाऱ्याकडून घेतल्या जाणाऱ्या विहित विभागीय परीक्षा</u>**

| अ.क्र. | विभाग | परीक्षा घेणारा प्राधिकारी | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशमन महाविद्यालय, नागपूर | सहायक केंद्र अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी |

०००००००

# परिशिष्ट-(३) 'ब'

# विभागीय परीक्षा (अग्निशमन)

## विभाग-अग्निशमन

## संवर्ग-अग्निशामक/ड्रायव्हर ऑपरेटर

**<u>तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा</u> :-** **(गुण- १००)**

| | | |
|---|---|---|
| १) | रासायनिक अग्निशामके | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| २) | शिड्या | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ३) | होज पाईप | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ४) | फोम व होम साधने | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ५) | हायड्रंट व होज फिटींग्ज | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ६) | पंप | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ७) | वॉटर रिले | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ८) | गाठी | - प्रकार, उपयोग, देखभाल व निगा |
| ९) | श्वसन उपकरणे | - साहित्याची नांवे व वापर |
| १०) | कवायत | - आज्ञापालन व सहकाऱ्याबरोबर कवायत करण्याची क्षमता |

**<u>लेखी परीक्षा</u> :-** **(गुण- १००, वेळ- २ तास)**

**१)** प्रथमोपचार - प्रथमोपचार पेटीतील साहित्य व भाजणे, अस्थिभंग, घुसमटणे, रक्तस्त्राव, जखमा यांचेवर करावयाच्या प्रथमोपचाराची माहिती देणे.

**२)** वॉचरूम कार्यपद्धती - वॉचरुममध्ये ठेवल्या जाणाऱ्या रेकॉर्डची माहिती, त्यासाठी वापरली जाणारी कार्यपद्धती नमुने व काल्पनिक संदेशावर वॉचरुमच्या रेकॉर्डमध्ये नोंद करणे.

**३)** अग्निशामक व ड्रायव्हर- पदाच्या कर्तव्यांची माहिती असणे व ती कर्तव्य पार पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाबद्दलचा तपशील ड्रायव्हर ऑपरेटर पदाची कर्तव्ये.

**४)** शिस्त व कर्तव्यपालन - शिस्तीचे व कर्तव्यपालनाचे अग्निशमन विभागातील महत्व व त्यांचे पालन न झाल्यास होणारे परिणाम. कर्तव्यपालन न झाल्यामुळे वा झाल्यामुळे आठवणीत राहिलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन.

**ooooooo**

# परिशिष्ट-(४)

## पदोन्नतीसाठी एकीकृत संवर्ग

**<u>प्रस्तावना</u> :-**

महानगरपालिकेच्या कामाची व्याप्ती विचारात घेऊन, वेळोवेळी विविध संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहेत. मात्र, या सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याकरिता प्रशासकीय कामाच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे:-

१. वर निर्देशित केल्याप्रमाणे विविध संवर्गाचे एकत्रीकरण प्रत्येक महानगरपालिकेने शासनाच्या प्रचलित नियमानुसार त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे निश्चित करावयाचे आहे.

२. या एकीकृत संवर्गातील पदधारक बदलीस आंतरपरिवर्तनीय असतील.

३. **<u>समावेशन</u> :-** जे कर्मचारी नियमितपणे पद धारण करीत असतील व संबंधित पदाच्या भरतीवेळी वेळोवेळी प्रचलित असलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या तरतुदीनुसार त्या पदावर नियुक्ती झालेली असेल तर संबंधित एकीकृत संवर्गात त्याचे नियमित समावेशन झाले आहे, असे मानले जाईल. म्हणजेच त्याने धारण केलेले पद ज्या एकीकृत संवर्गात समाविष्ट केले असेल, त्या एकीकृत संवर्गात त्याचे समावेशन होईल.

४. **<u>ज्येष्ठता</u> :-** एकीकृत संवर्गाची ज्येष्ठता महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

**०००००००**